# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे - ०४

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) - २०२४

## प्रसिध्दी पत्रक

**महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२४** परीक्षेचे आयोजन **दि. १०/११/२०२४** रोजी करण्यात आले होते. या परीक्षेतील पेपर क्र. I (इ. १ ली ते इ. ५ वी स्तर) व पेपर क्र. II (इ. ६ वी ते इ. ८ वी स्तर) चा अंतिम निकाल **दि.१४/०२/२०२५** रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जाहिर करण्यात आलेला आहे.

सदर परीक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्र त्या त्या जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद / शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे कार्यालयाकडे हस्तपोहोच देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे कार्यालयात **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२४** पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्राचे वाटप **दिनांक ०१/०९/२०२५ ते ०८/०९/२०२५** या कालावधीत केले जाणार आहे. पात्रता धारक उमेदवारांनी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या वेबसाईट वरील सूचना वाचून आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह ज्या जिल्हयात परीक्षा दिली तेथील जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक मंबई (उ/द/प) यांचे कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून आपले प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

ठिकाण : पुणे
दिनांक : २०/०८/२०२५

(अनुराधा ओक)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४

## प्रमाणपत्राचे वितरण खालील सूचना प्रमाणे करावे.

१. उमेदवारांनी खालील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या प्रती घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

**अ)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्र प्रत.

**ब)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत.

**क)** डी.टी.एड उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र अथवा बी.एड. उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक

**ड)** आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

**इ)** दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र.

**फ)** माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा.

**ग)** ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्राइव्हिंग लाईसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.)

२. प्रमाणपत्र वितरणाची पेपर निहाय नोंद वही ठेवावी. (त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी)

३. **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२४** परीक्षा **दि. १०/११/२०२४** चे पात्रता प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराला वितरित करताना प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर संबंधित विद्यार्थ्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.)/ शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे समक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वाक्षरी घेऊन व संबंधितांच्या प्रमाणपत्राची खात्री करुन शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी प्रमाणपत्र वितरीत करावे.

४. पात्र परीक्षार्थीना शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेकडे लेखी तक्रार नोंदवावी. अर्जासोबत पुरावा दर्शक कागदपत्रे (गुणपत्रक, प्रमाणपत्र) जोडावेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी सदर तक्रारींचा शहनिशा करुन स्व: अभिप्रायासह सदर तक्रारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे त्वरीत पाठवाव्यात.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.